ISSN 2229-7553

# JOURNAL OF ADVANCE PUBLIC ADMINISTRATION

VOL.No. V September 2015 - February 2016

Research Center of Public Administration
DEGLOOR COLLEGE , DEGLOOR
Dist-Nanded - 431717 (Maharashtra) India
www.degloorcollege.ac.in

Journal of Advance Public Administration is Published by Research Center of Public Administration, Degloor Collage, Degloor,Maharashtra. The Journal aims at promoting study and Research in Public Administration. The Views expressed in the Articles/Research papers published in the Journal are those of authors and the Publisher/Editor does not hold itself responsible for them.

**JOURNAL OF ADVANCE PUBLIC ADMINISTRATION**

# EDITORIAL BOARD

**Dr. Ashok M. Wakodkar**
Publisher / Editor
Principal, Degloor Collage, Degloor

**Dr. Balaji R. Katturwar**
Executive Editor
Degloor Collage, Degloor

## Members

**Dr. Renu Kapila**
Head, Department of Public Administration
Panjabi University,
Patiala, (Punjab)

**M. Veera Prasad**
Sri Krishnadevaraya University
Anantapur (Andhra Pradesh)

**G. Parvathi**
Yogi Vemana University, Kadapa (A.P.)

**Dr. Parasmal Bora**
H.O.D. (Retd.) Pub. Adm.
Dr. B.A.M. University
Aurangabad (M.S.)

**Dr. M.C. Pawar**
Associate Professor,
Dr. B.A.M. University, Aurangabad (M.S.)

**Dr. Panchshil Ekambekar**
Chairman, B.O.S.Pub.Adm.
S.R.T.M. University, Nanded.

VOL. No. V September 2015 - February 2016

CONTENTS


| | | | Page No. |
|---|---|---|---|
| 15) | **Participation Of People In Popular Programmes In India** | Dr. Anjanayya R.Bistee | 91 to 94 |
| 16) | **Women – Social Movements And Indian States** | Dr. Ravinder Gunti | 95 to 99 |
| 17) | **Analyzing Implementation Of Rajiv Gandhi Scheme For Empowerment Of Adolescent Girls In Punjab** | Daljit Kaur | 100 to 104 |
| 18) | **Delivering Environmental Justice: Perspective, Mitigations, And New Challenges In India** | Dr. Mohan Das. K, | 105 to 110 |
| 19) | लोप पावत चाललेली कार्यसंस्कृती : एक चिंतनीय बाब ! | प्राचार्य, डॉ.अशोक वाकोडकर | 111 to 112 |
| 20) | पर्यावरणाचे महत्त्व व व्यवस्थापन | डॉ.प्रतिभा उन्हाळे, | 113 to 114 |
| 21) | लोकप्रशासनातील कार्यक्षमता व माहितीचा अधिकार | डॉ. बी.आर.कत्तूरवार | 115 to 120 |
| 22) | मानवी विकासात आरोग्याचे महत्त्व | प्रा.संजय देबडे | 121 to 122 |

# २२) मानवी विकासात आरोग्याचे महत्त्व

**प्रा.संजय देबडे,**
लोकप्रशासन विभाग,
देगलूर महाविद्यालय,देगलूर.

आरोग्य हा मानवी विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. आरोग्याचे महत्त्व सदासर्वकाळ सारखेच असल्याचे विविध प्राचीन ग्रंथावरुन लक्षात येते. अनेक संस्कृतीच्या केंद्रस्थानी आरोग्याची संकल्पना असल्याचे दिसून येते. या विविध मानवी संस्कृतीमध्ये आरोग्याची वेगवेगळी व्याख्या करण्यात आलेली दिसून येते यापैकी 'आजारांचा अभाव म्हणजे आरोग्य' ही सर्वात जूनी व्याख्या असल्याचे दिसते. ग्रीक संस्कृतीच्या विचारधारेनूसार 'शारिरीक धातुचा (Humour) समतोलपणामध्ये निर्माण झालेला बिघाड म्हणजे आजार,' असे वर्णन करण्यात आले आहे. प्लेटो या प्राचीन तत्त्ववेत्याने 'सुदृढ मनासाठी सुदृढ शरीराची गरज असते,' असे म्हटले आहे. तर प्राचीन भारतीय ग्रंथात 'शरीर माद्यं खलु धर्म साधनम्,' म्हणजे कर्तव्य बजावण्यासाठी प्रथम शरीर सुदृढ असणे आवश्यक आहे. त्यामुळे शरीर सुदृढ ठेवणे एक कर्तव्य मानले गेले. आधुनिक वैद्यकशास्त्र हे फक्त आजारावर अधिक भर देतात व ते मानवी स्वास्थ्याकडे दुर्लक्ष करतात. अशी टिका त्यांच्यावर केली जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या सरनाम्यात आरोग्याची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे, 'आरोग्य म्हणजे फक्त रोग किंवा अशक्तता यांचा अभाव नसून समग्र शारिरीक, मानसिक व सामाजिक सुस्थितीत होय'. यावरुन असे दिसते की, आरोग्याच्या व्याख्येबाबत अभ्यासकात एकमत दिसून येत नाही. आरोग्य या बाबतचे दुर्लक्ष ही नेहमीची बाब बनलेली असून इतर गोष्टींच्या तुलनेत आरोग्य नेहमी दुय्यम ठरले आहे. जसे – पैसा, प्रतिष्ठा, सत्ता इ. जोपर्यंत आरोग्याची स्थिती खालावत नाही तोपर्यंत त्याचे महत्त्व लक्षात येत नाही.

आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील आरोग्य हा घटक दुर्लक्षित होता. पहिल्या महायुध्दानंतर राष्ट्रसंघाद्वारे तयार केलेल्या करारनाम्यात सर्वात शेवटी आरोग्याचा समावेश करण्यात आला. दूसऱ्या महायुध्दानंतर निर्माण संयुक्त राष्ट्राच्या सनदेमध्ये तर आरोग्याचा समावेशच नव्हता. १९४५ मध्ये सन फ्रान्सिस्को येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेमध्ये आरोग्याचा समावेश सनदेमध्ये करण्यात आला.

परंतू अलिकडे आरोग्याबाबत जागतिक दृष्टिकोन बदल झालेला दिसतो. त्यामुळे आरोग्याला आता मानवी हक्काचा दर्जा देण्यात आला आहे. जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी व मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी आरोग्य हा घटक महत्त्वाचा मानला जात आहे. भारतामध्ये सुध्दा आरोग्य हा मुलभूत मानवी हक्क मानला जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने कलम २१ चा अर्थ लावतांना आरोग्य हा देखील एक मूलभुत अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वामध्ये कलम ३८, ३९ (इ), ४१, ४२, ४७ आणि ४८ (अ) मध्ये आरोग्याचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे जनतेने आरोग्य अबाधित राखणे हे शासनाची प्रमुख जबाबदारी आहे. त्यानुसार जागतिक स्तरावर सर्वच राष्ट्र आपआपल्या नागरिकांना आरोग्य विषयक सेवा देत आहेत. १९७७ साली भरलेल्या जागतिक आरोग्य सभेमध्ये सर्व राष्ट्रांच्या समोर सर्वांत महत्त्वाचे कार्य किंवा आव्हान म्हणून 'सर्वांसाठी आरोग्य (Health for All)' हे उद्दिष्ट ठेवण्यात आले. पूढे १९७९ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत आरोग्य हा सामाजिक व आर्थिक विकासातील सर्वात महत्त्वपूर्ण घटक म्हणून त्यास मान्यता मिळाली. त्यामुळे सामाजिक व आर्थिक विकासात पर्यायाने नवीन सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यासाठीचा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून ओळखले जात आहे.

इ.स.१९६० पर्यंतच्या दशकापर्यंत देशाचा सामाजिक व आर्थिक विकास साध्य करणयासाठी नैसर्गिक साधन सामग्रीच्या वापरावर जास्त भर दिला जात होता. परंतू १९७० नंतर देशाचा सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्ती ऐवजी मानवी साधन संपत्ती महत्त्वाची मानण्यात येऊन या मानवी साधन संपत्तीच्या गुणात्मक विकासावर जास्त भर देण्यास सुरुवात झाली. देशाच्या विकास हा यंत्रे, नैसर्गिक साधन संपत्तीची उपलब्धता किती आहे ? यावर अवलंबून नसून त्या देशातील नागरिकांचा गुणात्मक विकास किती साध्य झाला आहे ? यावर अवलंबून असते ते तत्त्व मान्य करण्यात आले आहे. त्यामुळे देशात नुसती लोकसंखया असल्यापेक्षा त्या लोकसंख्येला आरोग्य, शिक्षण या सुविधा देवून त्यांचा गुणात्मक विकास करणे व त्याद्वारे देशाचा सर्वांगिण विकास साध्य करणे हे धोरण स्विकारुन त्यानुसार जगातील विविध देश आपल्या देशात आरोग्य विषयक कार्यक्रम राबवित आहेत.

**मानवी विकासात आरोग्याचे महत्त्व पुढील मुद्यावरुन स्पष्ट करता येईल :-**

१) व्यक्तीच्या निकोप शारिरीक व मानसिक वाढीसाठी उत्तम आरोग्य आवश्यक आहे.

२) आरोग्य स्थिती उत्तम असेल तरच व्यक्ती शिक्षणाच्या संधीचा उपयोग करुन आपला गुणात्मक विकास करु शकेल.

३) मानसिक दृष्ट्या स्वस्थ व्यक्तीच इतर व्यक्ती व समाजाबरोबर योग्य आंतरक्रिया करु शकेल.

४) उत्तम आरोग्य असलेला व्यक्ती उत्पादन कार्यात सक्षमपणे सहभागी होऊन, कार्यक्षमतेने कार्य करतील ज्यामूळे उत्पादन क्षमतेत वृध्दी होईल.

५) उत्तम आरोग्य असलेल्या स्त्रिया उत्पादक कार्यात कार्यक्षमतेने सहभागी होतील तसेच, सुदृढ मनुष्यबळ उपलब्ध होण्यास मदत होईल.

६) आरोग्याच्या सुविधा योग्य व सहज उपलब्ध केल्यास नागरिकांचे आयुर्मान वाढुन त्यांची उत्पादक वर्षे वाढतील.

७) आरोग्य उत्तम असेल तर शासनाचा आरोग्यावरील खर्च कमी होऊन तो खर्च इतर विकासविषयक कार्यावर खर्च करता येतो.

८) आरोग्य उत्तम असेल तर नागरिकांच्या आरोग्यावरील खर्च कमी होऊन देशांतर्गत आर्थिक बचत वाढण्यास मदत होते.

९) उत्तम मानसिक आरोग्य टिकवून राहणे हे आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात फार महत्त्वाचे बनले आहे.

अशा प्रकारे आरोग्य हा मानवी विकासात महत्त्वाची भुमिका पार पाडू शकतो. मानवाचा म्हणजेच देशातील नागरिकांचा गुणात्मक विकास झाल्यास देशाचा सामाजिक व आर्थिक विकास सहज साध्य होऊ शकतो.

**संदर्भ :**

१) भारतातील मानव संसाधन विकास – अमोल घोडके

२) राष्ट्रीय आरोग्य धोरण व दशा व दिशा – नितीन लवंगारे

३) आपले आरोग्य – शाम आष्टेकर

४) योजना – फेब्रु. २०१४.

५) कुरुक्षेत्र – ऑक्टो.२००८, ऑगस्ट २०१२.

६) Health Education – Mahadevan.